महाराष्ट्र शासन

# महाराष्ट्र राज्य व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,

शासकीय तंत्र निकेतन इमारत, क - विभाग, दुसरा मजला, 49 खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - 51.

दूरध्वनी क्रं. (022) 26474435 वेबसाईट - www.msbve.gov.in ईमेल - chairman-msbve@nic.in/msbve2003@yahoo.com

जा.क्र.मराव्यशिपमं/का-12/ शैक्षणिक विभाग/156 /2018 दिनांक :- 23 FEB 2018

परिपत्रक :-

विषय :- **मंडळाच्या पदविका अभ्यासक्रमाच्या द्वितीय वर्षात थेट प्रवेश देणेबाबत.**

संदर्भ :- 1) तांत्रिक गटाची दि. 05/10/2017 च्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार,
2) कार्यासन 12/ शैक्षणिक विभाग यांची दि. 29/01/2018 ची टिपण्णी
3) दिनांक 23/02/2018 रोजी आयोजित 50 व्या सर्वसाधारण बैठकीतील निर्णय

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरून मंडळाचे 1 वर्षिय प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण विद्यार्थ्यांना मंडळाच्या 2 वर्षिय पदविका अभ्यासक्रमास खालिल अटीं व शर्तीच्या आधिन राहून थेट द्वितीय वर्षात प्रवेश देण्याबाबत मान्यता देण्यात येत आहे. अटी व शर्ती खालिलप्रमाणे-

1) विद्यार्थी किमान 10 वी उत्तीर्ण असावा.
2) विद्यार्थी म.रा.व्य.शि. परिक्षा मंडळाचा 1 वर्षिय प्रमाणपत्र अभ्यासक्रम उत्तीर्ण असावा.
3) पदविका अभ्यासक्रमाला नियमित ट्रेड थेअरी व प्रात्यक्षिक सोबत तीन अतिरिक्त विषय शिकविले जातात त्यामुळे 10 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना अतिरिक्त विषयाचा अभ्यासक्रम पूर्ण करून घेण्याची जबाबदारी संस्थेची राहील.
4) एकुण प्रवेश क्षमतेच्या 10 टक्के मर्यादेपर्यंत (मंजूर क्षमता) अधिक रिक्त असलेल्या जागा एवढे प्रवेश थेट प्रवेशाद्वारे भरण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

उपरोक्त प्रमाणे अटी व शर्तांच्या आधिन राहून मंडळाच्या पदविका अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षास थेट प्रवेश देण्यास शैक्षणिक वर्ष 2018 पासून मान्यता देण्यात येत आहे. याबाबतचा सविस्तर कार्यक्रम नंतर कळविण्यात येईल.

(डी. ए. दळवी)
सचिव,
म.रा.व्यवसाय शिक्षण परीक्षा मंडळ,
मुंबई - 400 051.

प्रत :-

1) मा.सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, मुंबई / पुणे / नाशिक / अमरावती / औरंगाबाद / नागपूर यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
2) जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी, (सर्व) यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सविनय सादर.
3) संगणक विभाग यांना वेबसाईटवर टाकणेकरीता व पुढील कार्यवाहीसाठी.
4) मान्यता विभाग व परीक्षा विभाग याना पुढील कार्यवाहीसाठी